# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

<u>प्रेसनोट</u>

# पीएमपीएमएल कडून दोन बसमार्गांचा विस्तार व एका बसमार्गामध्ये बदल

- **<u>बसमार्ग क्र. ३५ अ व १६७ या दोन बसमार्गांचा विस्तार.</u>**
- **<u>बसमार्ग क्र. २७७ भोसरी ते कोथरूड डेपो या बसमार्गात बदल.</u>**
- **<u>दिनांक १ जुलै २०२३ पासून विस्तार व बदल.</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून प्रवाशांच्या मागणीनुसार बसमार्ग क्र. ३५ अ व १६७ या दोन बसमार्गांचा विस्तार करण्यात येत आहे. बसमार्ग क्र. ३५ अ शिवाजीनगर/सिमला ऑफिस ते डांगे चौक या मार्गाचा विस्तार इंदिरा कॉलेज (ताथवडे) पर्यंत करण्यात येत आहे व बसमार्ग क्र. १६७ वाघोली ते हडपसर या मार्गाचा विस्तार भेकराईनगर डेपो पर्यंत करण्यात येत आहे.

याचबरोबर बसमार्ग क्र. २७७ – भोसरी ते कोथरूड डेपो या मार्गात बदल करून पिंपळेगुरव, साईचौक व सांगवी मार्गे करण्यात येत आहे. हे सर्व बदल दि. ०१/०७/२०२३ पासून करण्यात येणार आहेत.

<u>बसमार्गांचा तपशील खालीलप्रमाणे</u>

- मार्ग क्रमांक ३५ अ – शिवाजीनगर/सिमला ऑफिस ते इंदिरा कॉलेज (ताथवडे).
  - मार्गे – औंधगाव, डांगे चौक, ताथवडेगाव,जे.एस.पी.एम कॉलेज,डी.वाय.पाटील कॉलेज.
  - बस संख्या – ३.
  - वारंवारिता – ५० मिनिटे.
- मार्ग क्रमांक १६७ – भेकाराईनगर डेपो ते वाघोली.
  - मार्गे – मगरपट्टा, मुंढवा व खराडी बायपास.
  - बस संख्या – १६.
  - वारंवारिता – १० मिनिटे.
- मार्ग क्रमांक २७७ – भोसरी ते कोथरूड डेपो.
  - मार्गे – पिंपळेगुरव, साईचौक व सांगवी.
  - बस संख्या – ४.
  - वारंवारिता – ६० मिनिटे.

वरीलप्रमाणे प्रवाशांच्या मागणीनुसार व सोयीसाठी दि. ०१/०७/२०२३ पासून बसमार्ग सुरू करण्यात येत असून या बससेवेचा लाभ प्रवाशी नागरीक, विद्यार्थी, नोकरदार, महिला वर्ग व ज्येष्ठ नागरीक यांनी घ्यावा असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

sd/-

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. २८/०६/२०२३

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-

कामगार व जनता संपर्क अधिकारी

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---